# महाराष्ट्र विधानपरिषद

## दुसरे (पावसाळी) अधिवेशन, २०२६

---

### अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

### प्रश्नांची एकूण संख्या - २०

---

### सन २०२३-२४ च्या संचमान्यतेनुसार अतिरिक्त ठरलेल्या शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांचे समायोजन करण्याच्या प्रक्रियेबाबत

**(१) ३२७ (२४-०४-२०२५) श्री.किरण सरनाईक, श्री.सुधाकर अडबाले, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.अभिजित वंजारी, श्री.धीरज लिंगाडे, श्री.ज्ञानेश्वर म्हात्रे, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.जयंत आसगावकर, श्री.संजय खोडके, श्री.विक्रम काळे :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शाळांच्या संचमान्यता ह्या ऑनलाइन पध्दतीने जनरेट होतात. संचमान्यतेवरून एखाद्या शाळेस मंजूर शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी किती असावेत हे निश्चित होत असतात. बऱ्याच शाळांच्या संचमान्यता चुकीच्या जनरेट होतात किंवा प्रलंबित राहत असून संचालक कार्यालयाकडे गेल्या वर्षात प्राथमिक व माध्यमिक संच मान्यता दुरुस्तीचे एकूण किती प्रस्ताव प्रलंबित आहेत तसेच सन २०२३-२४ च्या संच मान्यतेनुसार अतिरिक्त ठरलेल्या शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांचे समायोजन करण्याची प्रक्रिया सुरु असल्याचे माहे जानेवारी, २०२५ च्या दुसऱ्या आठवड्यात निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ३६०० शाळांमधील कार्यरत पदांची माहिती प्रलंबित असल्याने विद्यार्थी संख्या असूनही शिक्षकांची पदे मंजूर न होणे, उपमुख्याध्यापक/पर्यवेक्षक ही पदे मंजूर न होणे, यामुळे काही शाळांच्या संचमान्यता चुकत असतात. यामुळे पदभरती, बदली, समायोजन किंवा पदोन्नती वेळी अडचणी निर्माण होत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, आजी माजी लोकप्रतिनिधींनी संच मान्यता दुरुस्ती व्हावे म्हणून निवेदने दिली आहेत यापैकी NIC कडून किती प्रस्ताव तांत्रिक त्रुटीसाठी पाठविले तसेच दुबार दुरुस्तीसाठी प्राथमिक व माध्यमिक किती प्रस्तावांची NIC ने संच दुरुस्ती करून पाठवली आहे,तसेच त्यापैकी आवक जावक नोंद तारखेसह किती प्रस्तावांच्या दुरुस्ती करण्यात आल्या अथवा फेटाळण्यात आले आहेत,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने सन २०२३-२४ च्या सदोष संच मान्यतेनुसार अतिरिक्त ठरलेल्या शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांचे समायोजन प्रक्रिया थांबविणेबाबत, संच मान्यता दुरुस्तीचे अधिकार त्या - त्या विभागीय शिक्षण उपसंचालक कार्यालयास देण्याबाबत व प्राथमिक व माध्यमिक शाळांचे संच मान्यता दुरुस्ती प्रस्ताव निकाली काढणेबाबत तसेच आजी माजी

लोकप्रतिनिधींनी संच मान्यता दुरुस्ती व्हावे म्हणून दिलेल्या निवेदनाच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दादाजी भुसे (२९-०४-२०२६) :** (१), (२) व (३) राज्यात सन २०१४-२०१५ पासून ऑनलाईन संच मान्यता करण्याची कार्यप्रणाली सुरु झाली असून त्यानुसार, जिल्हा परिषद, महानगरपालिका, नगरपालिका, नगरपरिषद व खाजगी प्राथमिक/माध्यमिक अनुदानित, अंशतः अनुदानित व विनाअनुदानित शाळांना दरवर्षी आधार वैध पटसंख्या नोंदणीनुसार विहित निकषान्वये संच मान्यता करुन पदे मंजूर केली जातात. सरल प्रणालीवरील माहिती अपूर्ण स्वरुपात/अयोग्य असल्याच्या तांत्रिक कारणाने संचमान्यता चुकीच्या जनरेट होतात किंवा प्रलंबित राहतात. अशा सदोष संच मान्यतांच्या दुरुस्तीचे प्रस्ताव संचालनालय स्तरावर वेळोवेळी निकाली काढण्यात येतात. सन २०२३-२४ मध्ये ५८ शाळांच्या संचमान्यता स्थलांतर, अपूर्ण स्वरुपाची भरलेली माहिती, अशा व इतर कारणांमुळे प्रलंबित असून अशा शाळांच्या संचमान्यतांबाबत संचालनालय स्तरावर कार्यवाही सुरू आहे.
(४) आयुक्त (शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे दिनांक १०/११/२०२१ च्या पत्रान्वये शासकीय सेवा अधिक सुलभतेने प्रदान करण्याकरीता संच मान्यता दुरुस्ती विषयक सध्या उपलब्ध असलेल्या सुविधांपैकी काही सुविधा शिक्षण संचालक व विभागीय शिक्षण उपसंचालक यांच्या स्तरावर उपलब्ध करून देण्यात आलेल्या आहेत.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## दिनांक १ नोव्हेंबर, २००५ पूर्वी नियुक्ती व तद्नंतर व सेवानिवृत्त झालेल्या शिक्षक-शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे सहाव्या व सातव्या वेतन आयोगाची थकबाकी प्रलंबित असल्याबाबत

**(२) ५४६ (२४-०४-२०२५) श्री.सुधाकर अडबाले, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.अभिजित वंजारी, श्री.धीरज लिंगाडे :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) दिनांक १ नोव्हेंबर २००५ पूर्वी नियुक्त कार्यरत व सेवानिवृत्त शिक्षक – शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांचे जीपीएफ / एनपीएस खाते नसल्याचे माहे जानेवारी, २०२५ च्या दुसऱ्या आठवड्यात निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर कार्यरत व सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांना सहाव्या / सातव्या वेतन आयोगाचे थकबाकीचे हप्ते अजूनही मिळालेले नाहीत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर शिक्षक – शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांचे जीपीएफ / एनपीएस खाते नसल्याची कारणे काय आहेत,
(४) असल्यास, १ नोव्हेंबर २००५ पूर्वी नियुक्त जीपीएफ / एनपीएस खाते नसलेल्या कार्यरत व सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांना सहाव्या / सातव्या वेतन आयोगाचे थकबाकीचे सर्व हप्ते मिळण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दादाजी भुसे (१५-०४-२०२६) :** (१), (२), (३), (४) अंशत: खरे आहे. शासन पत्र दिनांक १७ फेब्रुवारी २०२१ मधील तरतुदीनुसार सहाव्या वेतन आयोगाच्या थकबाकीचे हप्ते रोखीने अदा करण्यात आलेले आहेत. तसेच ज्या शिक्षक शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी डीसीपीएस/एन.पी.एस. खाते उघडले नाही त्यांचे सहाव्या वेतन आयोगाचे हप्ते देण्यात तांत्रिक अडचणी येत आहेत. राज्यात डीसीपीएस/एनपीएस लागू असतानाही सदर खाते न उघडलेल्या कार्यरत शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी डीसीपीएस/एनपीएस खाती उघडल्यानंतरच त्यांचे सातव्या वेतन आयोगाचे हप्ते अदा करावे व सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांचे सातव्या वेतन आयोगाचे हप्ते रोखीने अदा करण्यात यावेत असा निर्णय शासन स्तरावर घेण्यात आला आहे. त्यानुसार शासन पत्र दिनांक १६/०८/२०२४ अन्वये कळविल्याप्रमाणे दिनांक २३/१०/२०२४ रोजीच्या पत्रान्वये शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक) महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी सर्व विभागीय उपसंचालक, सर्व शिक्षणाधिकारी (माध्यमिक) तसेच सर्व अधीक्षक, वेतन व भविष्य निर्वाह निधी पथक (माध्यमिक) यांना ज्या शिक्षक शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजनेचे (NPS) खाते उघडले नाहीत व ते सेवानिवृत्त झालेले आहेत फक्त अशा शिक्षक शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना सातव्या वेतन आयोगाचे हप्ते रोखीने देण्यात यावे असे कळविण्यात आले आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## चिडीमार पथकांची धडक कारवाई आणि ११२ क्रमांकाच्या हेल्पलाईन बाबत जनजागृती करणेबाबत

**(३) ५६१ (२२-०४-२०२५) श्रीमती चित्रा वाघ :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात शाळा व कॉलेज येथील मुलींची छेडछाड करणाऱ्या रोडरोमियों करीता चिडीमार पथके कार्यरत असून त्यानंतर निर्भया स्कॉड्सची देखील नेमणूक केली आहे तसेच शासनाने महिला सुरक्षितेकरीता ११२ हेल्पलाईन क्रमांक असल्याचेही माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शासनाने महिला सुरक्षिततेबाबत जनजागृती करण्याकरीता कोणते नियम /उपाययोजना तयार केल्या आहेत तसेच त्यांच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी शासनाने कोणती कार्यवाही अथवा उपाययोजना केली आहे वा करण्यात येत आहे,
(३) असल्यास, राज्यातील प्रत्येक शाळा, महाविद्यालये, सार्वजनिक ठिकाणे बस-बसस्थानके, रेल्वे-रेल्वे स्थानके येथे या ११२ क्रमांकाच्या हेल्पलाईनची जाहिरात, प्रचार करण्यासंदर्भात शासनाने नियोजन केले असल्याचे तसेच या हेल्पलाईन क्रमांकाच्या प्रचार व प्रसारासाठी अंगणवाडी सेविकांना समाविष्ट करून घेण्यात येणार आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, राज्यात एकूण किती चिडीमार पथके किंवा निर्भया स्कॉड्स कार्यरत आहेत व त्यांचे नियम व निकष काय आहेत, चिडीमार पथकासंदर्भात तसेच ११२ हेल्पलाईन बद्दल प्रचार प्रसार करण्यासंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही अथवा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस (२८-०१-२०२६) :** (१) हे, खरे आहे.

राज्यात शाळा व कॉलेज येथील मुलींची छेडछाड करणाऱ्या रोडरोमियों करीता चिडीमार पथक (दामिनी पथक) मुंबई व्यतिरीक्त सर्व पोलीस घटकात कार्यरत असून, मुंबई शहरात निर्भया पथक कार्यरत आहे. डायल ११२ हा प्रकल्प केंद्र पुरस्कृत सर्व व्यापी प्रकल्प असून नागरिकांना त्यांच्या समस्यांना अतिशीघ्र प्रतिसाद मिळावा यासाठी शासनाने अंमलात आणलेला आहे.

(२) राज्यात महिला अत्याचार प्रतिबंध करण्यासाठी पुढीलप्रमाणे उपाययोजना करण्यात आल्या आहेत:-

१) राज्यात महिला व बालकांच्या अनैतिक मानवी वाहतुकीस प्रतिबंधक करण्याच्या उद्देशाने एकूण ४५ अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंधक कक्षांची स्थापना करण्यात आली आहे.

२) राज्यात महिला व बालकांच्या सुरक्षिततेसाठी निर्भया पथकाची स्थापना करण्यात आली आहे.

३)महिला व मुली यावरील अत्याचारास प्रतिबंध करण्याकरीता पोलीसांची गस्त वाढविणे, पोलीस काका, पोलीस दीदी या उपाययोजना करण्यात येत आहेत.

४) राज्यात सर्व पोलीस ठाणे स्तरावर महिला मदत कक्षाची स्थापना करण्यात आली आहे.

५) राज्यात २० पोक्सो व १२ जलदगती न्यायालय स्थापन करण्यात आले आहेत.

६) बलात्कार व ॲसिड हल्यातील पिडीत व्यक्तींना १० लाखापर्यंत मदत दिली जाते.

७) महिला हेल्पलाईन क्र. १०३, १०९१, ११२ कार्यरत असून त्याव्दारे महिलांना २४*७ मदत देण्यात येते.

(३) डायल ११२ या प्रणालीच्या उपयुक्ततेबाबत सामान्य जनमाणसात जागरुकता व प्रसिद्धी होण्याकरीता केंद्रीय गृह मंत्रालयाकडून प्राप्त झालेले दिनांक १४/०३/२०२३ रोजीचे प्रसिद्धीपत्रक सर्व घटक कार्यक्षेत्रात ठिकठिकाणी दर्शनी भागांमध्ये पोस्टर, बॅनर्स, फ्लेक्स, फलक इ. स्वरुपात प्रदर्शित करण्याबाबत सर्व घटक प्रमुखांना निर्गमित करण्यात आले आहे.

(४) महाराष्ट्र राज्यात जिल्हा / उपविभागीय स्तरावर एकूण १८५ चिडीमार पथके (दामिनीपथक) कार्यान्वित आहेत.

तसेच अपर पोलीस महासंचालक, महिला व बाल अपराध प्रतिबंध विभाग कार्यालयाकडून महिला व बालकांशी निगडीत कक्षांची प्रभावीपणे अंमलबजावणी होण्याबाबत स्थायी आदेश सर्व घटकांना प्रसारित करण्यात आले आहेत.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील वीज उपकेंद्रे कंत्राटी पध्दतीने चालविण्याची निविदा प्रक्रिया रद्द करण्याबाबत

**(४) १७०० (२४-०४-२०२५) श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.अभिजित वंजारी :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील ३२९ वीज उपकेंद्रे कंत्राटी पध्दतीने चालविण्यासाठी रुपये ५,९३५ कोटींची निविदा काढण्यात आली असून या निर्णयाविरोधात महाराष्ट्र राज्य विद्युत कर्मचारी, अभियंते, अधिकारी कृती समितीने महावितरण कंपनीसह ऊर्जा सचिवांना आंदोलनांचा इशारा दिल्याचे माहे जानेवारी २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महावितरण कंपनीमध्ये सध्या मंजूर असलेली वर्ग १ ते ४ या प्रवर्गातील ३२ हजार पदे रिक्त आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, वीज उपकेंद्रे कंत्राटी पध्दतीने चालविण्याची निविदा प्रक्रिया रदद करण्याबाबत तसेच महावितरणमधील रिक्त पदे त्वरीत भरण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस (२२-०१-२०२६) :** (१) राज्यातील ३२९ वीज उपकेंद्रे बाह्यस्त्रोत कमचाऱ्यांमार्फत संचालित करण्यासाठी रुपये ५९.३५ कोटींची निविदा काढण्यात आली होती. या निर्णयाविरोधात महाराष्ट्र राज्य विद्युत कर्मचारी, अभियंते, अधिकारी कृती समितीने उपरोक्त आंदोलनाचे पत्र मा.अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक, महावितरण यांना अग्रेषित केलेले असून सदर पत्र या विभागासा दिनांक १०/०२/२०२५ रोजी प्राप्त झालेले आहे.
(२) महावितरण मध्ये वर्ग १ ते ४ या प्रवर्गातील ३०,३३३ हजार पदे रिक्त आहेत. त्यातील २३,७९१ इतक्या रिक्त पदांच्या जागी बाह्यस्त्रोत कर्मचारी कार्यरत आहेत.
(३) महावितरण ३२९ वीज उपकेंद्राचे खाजगीकरण करत नसून महावितरण कंपनीची २०१९ नंतर कार्यान्वित केलेल्या या उपकेंद्रांचे संचालन कुशल व प्रशिक्षित मनुष्यबळाव्दारे करण्यासाठी व देखभाल दुरुस्ती व इतर सुविधा पुरविण्याकरीता निविदा प्रकाशित करण्यात आली आहे, सदर निविदा प्रक्रियेधीन आहे. महावितरणमधील रिक्त पदांच्या जागी २३,८९१ इतके बाह्यस्त्रोत कर्मचारी कार्यरत असून सद्य:स्थितीत जाहिरात क्र. ०६/२०२३ अन्वये ५,३८६ विद्युत सहाय्यकांची पदे सरळ सेवा भरतीव्दारे भरण्याबाबतची कार्यवाही सुरु आहे.
(४) लागू नाही.

---

## महावितरण कंपनीच्या दिनदयाळ उपाध्याय ग्रामज्योती योजनेबाबत

**(५) २२३४ (२४-०४-२०२५) श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.अभिजित वंजारी :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्य शासनाच्या महावितरण कंपनीच्या दिनदयाळ उपाध्याय ग्रामज्योती योजना तसेच आयपीडीएस योजनेचे कॅगने सन २०२०-२१ चे लेखापरीक्षण (ऑडिट) करुन त्याचा प्रारूप (ड्राफ्ट) अहवाल (ऑडिट रिपोर्ट) महावितरणला दाखल करुन ४ वर्षे झाली असून त्याचा अंतिम अहवाल (फायनल रिपोर्ट) मा.राज्यपाल, महाराष्ट्र राज्य यांचेकडे अद्याप दाखल केलेला नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत १०० पेक्षा जास्त लेखा परिच्छेद (ऑडिट पॅरा) नियमबाहयपणे बंद करण्यात आल्यामुळे गैरव्यवहार झाल्याचा संशय व्यक्त होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, यासंदर्भात शासनाने माहिती घेऊन व चौकशी करुन संबंधितांवर कारवाई करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस (२७-०१-२०२६) :** (१) व (२) महावितरण कंपनीच्या दिनदयाळ उपाध्याय ग्रामज्योती योजना तसेच आयपीडीएस योजनेचे कॅगने केलेल्या लेखापरीक्षणांचा अंतिम अहवाल प्रधान

महालेखापाल कार्यालय,नवी दिल्ली (कॅग) या कार्यालयातून अद्याप जारी केलेला नसल्याने सदर अहवाल मा.राज्यपाल महोदयांकडे सादर करण्यात आलेला नाही.
(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## भांडूप (प) (मुंबई) येथील नॅशनल स्कूल मधील शाळकरी मुलीला अज्ञात व्यक्तीने इंजेक्शन देऊन बेशुध्द केल्याबाबत

**(६) २२४५ (२४-०४-२०२५) श्री.विक्रांत पाटील :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबई, भांडुप (प) येथील नॅशनल स्कूलमधील ९ वर्षीय शाळकरी मुलीला अज्ञात व्यक्तीने शाळेच्या मैदानातून निर्जनस्थळी नेवून तीला इंजेक्शन देऊन बेशुध्द केल्याबाबतची बाब दिनांक ३१ जानेवारी २०२५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास,उक्त प्रकरणी चौकशी करण्याकरीता भांडुप पोलिसांनी या प्रकरणाच्या तपासासाठी चार पथक नेमली आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास,सदर प्रकरणी चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व चौकशीच्या अनुषंगाने संबंधित दोषींवर कारवाई करण्याकरीता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस (२८-०१-२०२६) :** (१) हे, खरे नाही.
(२) व (३) सदर प्रकरणी भांडुप पोलीस ठाणे, मुंबई येथे गु.र.क्र.७८/२०२५,भा.न्या.सं. २०२३ चे कलम १२५, १२५ (अ) सह बाल न्याय अधिनियम (मुलांची काळजी व संरक्षण अधिनियम-२०१५) कलम ७५, ७७ अन्वये दिनांक ०१/०२/२०२५ रोजी गुन्हा नोंद करण्यात आला आहे. सदर प्रकरणी गुन्ह्याच्या तपासकामी ४ पथके तयार करुन गुन्ह्याच्या घटनास्थळाच्या सीसीटीव्ही फुटेजची पडताळणी करण्यात आली. तसेच, गुन्ह्याच्या तपासाच्या अनुषंगाने ५३ साक्षीदारांकडे चौकशी करण्यात आली असता शाळेच्या आवारात कोणीही संशयित इसम प्रवेश करताना आढळून आलेला नाही.

सदर गुन्ह्याच्या केलेल्या तपासात गुन्ह्याची तक्रार ही घटनेबाबत गैरसमज झाल्याने दिली असल्याचे निष्पन्न झाल्यामुळे नमूद गुन्ह्याची "क" वर्ग समरी मंजूर होणेकरीता गुन्ह्याची कागदपत्रे मा.प्रथम वर्ग न्याय दंडाधिकारी, ५३ वे न्यायालय,मुलुंड,मुंबई यांचे न्यायालयात दाखल करण्यात आली असून त्याचा क्र.Misc.Case/६९९/२०२५ असा आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## डेक्कन ओडिसी रेल्वे बंद असल्याने कोट्यावधी रुपयांच्या महसूलाचे नुकसान होत असल्याबाबत

**(७) २२६४ (१६-०६-२०२५) श्रीमती उमा खापरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, ॲड.निरंजन डावखरे :** सन्माननीय **पर्यटन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) महाराष्ट्र शासन आणि मध्य रेल्वेच्या संयुक्त विद्यमाने देश विदेशातील पर्यटकांसाठी सुरू केलेली

डेक्कन ओडिसी रेल्वे मागील अनेक वर्षापासून यार्डामध्ये उभी असून पर्यटकांची गैरसोय होत आहे तसेच शासनाचा कोट्यवधी रुपयांचा महसूल बुडत असल्याची बाब माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्या सुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, पर्यटकांसाठी सुरू करण्यात आलेली डेक्कन ओडिसी रेल्वे कोणत्या कारणासाठी बंद करण्यात आली याबाबत शासनाकडे माहिती उपलब्ध नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, पर्यटकांसाठी असलेली डेक्कन ओडिसी गाडी लवकर सुरू करून शासनाचा बुडत असलेला महसूल पुन्हा सुरू करण्यासाठी आणि पर्यटकांची होणारी गैरसोय दूर करण्यासाठी शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे काय,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.शंभूराज देसाई (०४-०२-२०२६) :** (१) (२) व (३) हे, खरे नाही.

डेक्कन ओडिसी ट्रेन ही पंचतारांकित सुखसोईनी सुसज्ज ट्रेन असून या ट्रेनमध्ये पर्यटनासाठी परदेशी पर्यटक येत असून त्यामध्ये परदेशी पर्यटकांचे प्रमाण सुमारे ९५ % आहे. पण २०२० पासून जगभरात कोरोना विषाणूचा प्रादुर्भाव झाल्यामुळे परदेशी पर्यटकांना भारत सरकारने व्हिजाद्वारे प्रवेश बंद केल्यामुळे काही दिवस डेक्कन ओडिसी ट्रेन बंद करण्यात आली होती.

सद्या डेक्कन ओडिसी या ट्रेनचे संचालन मे. एबिक्स ट्रॅव्हलद्वारे करण्यात येत असून सन २०२३-२४ पासून ही ट्रेन समाधानकारपणे सुरु असून त्यातून शासनास महसूल प्राप्त होत आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## नागपूर शहरातील अनधिकृत शाळांवर कारवाई करणेबाबत

**(८) ३०६५ (१८-०७-२०२५) श्री.संदीप जोशी :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नागपूर शहरात सन २०१६ पासून ते सन २०२४ पर्यंत इयत्ता १ ते १० वी पर्यंत शासनाच्या मंजुरीशिवाय अनधिकृतरित्या शाळा चालविण्यात येत असल्याचे माहे मे,२०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सन २०१६ ते २०२४ या कालावधीत किती अनधिकृत शाळा चालविल्या जात असून अद्यापपर्यंत किती अनधिकृत शाळांवर व संबंधित शिक्षणाधिकाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दादाजी भुसे (२२-०४-२०२६) :** (१) अंशतः खरे आहे.
(२) शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जि.प.नागपूर यांनी नागपूर शहरातील अनधिकृत शाळांबाबत केलेल्या तपासणी दरम्यान ८ अनधिकृत शाळा सुरू असल्याचे आढळून आले होते. सदर ८ अनधिकृत शाळांपैकी, ४ शाळांवर फौजदारी गुन्हा दाखल करण्यात आलेला असून उर्वरित ४ शाळा बंद करण्यात आलेल्या आहेत
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यातील पर्यटन क्षेत्राला चालना देण्यासाठी आणि पर्यटकांच्या सुरक्षिततेसाठी महाराष्ट्र पर्यटन सुरक्षा दल स्थापन करण्याबाबत

**(९) ३९२५ (१८-०७-२०२५) श्री.हेमंत पाटील :** सन्माननीय **पर्यटन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील पर्यटन क्षेत्राला चालना देण्यासाठी आणि पर्यटकांच्या सुरक्षेच्या दृष्टीने राज्य शासनाने महाराष्ट्र पर्यटन सुरक्षा दल (पर्यटन मित्र) स्थापन करण्याचा निर्णय घेतला असून राज्यात येणाऱ्या पर्यटकांच्या मनात सुरक्षिततेची भावना निर्माण व्हावी, तसेच राज्यातील संस्कृती, इतिहास, पर्यटनस्थळे, कायदा, नियम, पर्यटनाविषयी आवश्यक माहिती देण्यासाठी मार्गदर्शक (गाईड), पर्यटन स्थळांवर सुरक्षिततेसाठी जवान अथवा पोलिसांची नियुक्ती करण्यात येणार आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यासंदर्भात राज्यसुरक्षा मंडळाकडे प्रस्ताव सादर करण्यात आला असल्याचे तसेच सुरक्षा दलातील जवानांना पर्यटकांच्या सुरक्षिततेसाठी आवश्यक प्रशिक्षण, वाहन व्यवस्था व अन्य सुविधा पुरविल्या जाणार असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त निर्णयाच्या अनुषंगाने अंमलबजावणीबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.शंभूराज देसाई (०४-०२-२०२६) :** (१) हे, खरे आहे.

महाराष्ट्र राज्यातील पर्यटनस्थळी भेट देणाऱ्या पर्यटकांच्या मनात सुरक्षिततेची भावना निर्माण करणे आणि राज्यातील संस्कृती, इतिहास, रीतीरिवाज, पर्यटनस्थळे इ. बाबतची माहिती पर्यटकांना देण्यासाठी दिनांक १७/०४/२०२५ रोजीच्या विभागाच्या शासन परिपत्रकान्वये महाराष्ट्र पर्यटन धोरण २०२४ अंतर्गत “महाराष्ट्र पर्यटन सुरक्षा दल” निर्माण करण्यात आले आहे.

(२) व (३) हे खरे आहे.

महाबळेश्वर महोत्सवाकरीता नियोजन आणि पर्यटक सुरक्षा याकरीता प्रायोगिक तत्वावर सातारा जिल्ह्यामध्ये महाराष्ट्र पर्यटन सुरक्षा दल नियुक्त करण्यात आले असून त्यासाठी महाराष्ट्र राज्य सुरक्षा महामंडळाकडील एकूण २५ जवानांची नेमणूक करण्यात आली होती. तसेच, पर्यटकांची सुरक्षितता आणि महोत्सवाचे नियोजन याकरीता सुरक्षा दलास आवश्यक ते प्रशिक्षण, वाहन व्यवस्था जिल्हा पोलीस अधीक्षक, सातारा यांच्यामार्फत करण्यात आली आहे.

४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## दिपकनगर औष्णिक विद्युत केंद्रातील उप कार्यकारी अभियंता यांच्या दिव्यांगत्व प्रमाणपत्राची पडताळणी करण्याबाबत

**(१०) ३९६६ (१८-०७-२०२५) श्री.एकनाथराव खडसे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दिपनगर औष्णिक विदयुत केंद्र भुसावळ (जि.जळगाव) येथील उपकार्यकारी अभियंता यांनी बनावट दिव्यांग प्रमाणपत्र वापरून नोकरीचा लाभ घेऊन शासनाची फसवणूक केली असल्याने सदर प्रमाणपत्राची

चौकशी करण्याकरीता लोकप्रतिनिधी यांनी दिव्यांग कल्याण आयुक्त यांचेकडे निवेदन सादर केले असल्याची बाब दिनांक १० फेब्रुवारी, २०२५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व चौकशीच्या अनुषंगाने भुसावळ औष्णिक विदयुत केंद्र दिपनगर येथील उपकार्यकारी अभियंता यांचेवर शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस (२२-०१-२०२६) : (**१) दिव्यांग प्रवर्गातून नोकरी मिळविलेल्या संशयित उमेदवारांची वैद्यकिय फेरतपासणी करुन खोट्या प्रमाणपत्रधारक उमदेवारांवर कार्यवाही करण्याबाबत जिल्हा शल्य चिकित्सक, सामान्य रुग्णालय, चंद्रपूर यांचे दिनांक ०५/११/२०२४, मा.आयुक्त, दिव्यांग कल्याण आयुक्तालय, पुणे यांचे दिनांक २५/०८/२०२४ व मा.श्री.एकनाथराव गणपतराव खडसे, महाराष्ट्र विधान परिषद सदस्य यांचे दिनांक १०/०२/२०२५ रोजीची पत्रे भुसावळ औ.वि.नि.केंद्रे कार्यालयास प्राप्त झाली होती.
(२) श्री.केंद्रे यांनी दिनांक ०७/०४/२०२५ रोजी वैश्विक दिव्यांग ओळखपत्र (UDID Card) भुसावळ औ.वि.नि.केंद्र येथे सादर केले होते. भुसावळ औ.वि.नि.केंद्र यांनी त्यांचे पत्र क्र.२४५९ दिनांक ०६/०६/२०२५ अन्वये श्री.माधव गोविंदराव केंद्रे यांना सामान्य रुग्णालय, जळगांव येथे वैद्यकिय फेरतपासणी करण्याकरीता उपस्थित राहण्याबाबत कळविले होते. तथापि, जिल्हा सामान्य रुग्णालय, जळगांव यांनी श्री.केंद्रे यांची वैद्यकीय तपासणी केंद्र शासनाचे अधिकृत व तज्ञ संस्थान अली यावर जंग राष्ट्रीय वाक् एवं श्रवण दिव्यांगजन संस्थान (AYJNISHD), मुंबई येथे करण्याबाबत निर्देशित केले होते. त्यास अनुसरून श्री.केंद्रे यांनी जंग राष्ट्रीय वाक् एवं श्रवण दिव्यांगजन संस्थान (AYJNISHD), मुंबई येथे तपासणी केली असता अली यावर जंग राष्ट्रीय वाक् एवं श्रवण दिव्यांगजन संस्थान (AYJNISHD), मुंबई यांचेमार्फत प्राप्त अहवालानुसार श्री.केंद्रे यांना दोन्ही कानांमध्ये श्रवणदोष असल्याचे निदान करण्यात आले आहे. प्राप्त अहवालानुसार श्री.केंद्रे यांचे दिव्यांगत्व तपासणी अंती योग्य असल्याचे निदर्शनास आले आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## मुंबई पोलीस दलासाठी ४५ हजार निवासस्थाने उपलब्ध करून देण्याबाबतच्या प्रस्तावाबाबत

**(११) ४६८२ (१७-१२-२०२५) श्री.सुनिल शिंदे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबई पोलीस दलासाठी ४५ हजार निवासस्थाने उपलब्ध करून देण्याबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन असून यासाठी राज्य शासनाकडून स्वतंत्र समितीची स्थापना करण्यात आली आहे, हे खरे आहे काय;
(२) असल्यास, सदरहू प्रस्तावाचे आणि समितीच्या रचनेचे थोडक्यात स्वरूप काय आहे,
(३) असल्यास, सदरहू समितीला पोलीस हाउसिंग टाऊनशिप प्रकल्प उभारण्याप्रकरणी अभ्यास करून शासनाला अहवाल सादर करण्यासाठी किती महिन्यांचा कालावधी निर्धारित करून देण्यात आला आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस (२८-०१-२०२६) :** (१) होय.

(२) शासन निर्णय, दिनांक १०/१०/२०२५ अन्वये ७५ भूखंडांवर पोलीस कर्मचारी, पोलीस अधिकारी व वरिष्ठ पोलीस अधिकारी यांच्याकरीता निवासस्थान तयार करण्यासाठी "पोलीस हाऊसिंग टाऊनशिप" प्रकल्प राबविण्याकरीता प्रकल्पाचा सविस्तर अभ्यास करून शासनास शिफारस करण्याकरीता अपर मुख्य सचिव, गृह यांच्या अध्यक्षतेखाली उच्चस्तरीय समिती गठीत करण्यात आली आहे. सदर समितीची पहिली बैठक दिनांक १४/११/२०२५ रोजी पार पडली असून बैठकीतील चर्चेनुसार पुढील कार्यवाही करण्यात येत आहे.

(३) सदर समितीस शासनास अहवाल सादर करण्यासाठी कालावधी निर्धारित केलेला नाही. तथापि, समितीच्या शिफारशींच्या अनुषंगाने मा.मंत्रीमंडळापुढे प्रस्ताव सादर करण्यात येणार आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## मुंबईतील कार्यालयांच्या वेळांमध्ये बदल करण्याबाब

**(१२) ४७४९ (१४-१२-२०२५) श्री.सत्यजीत तांबे, अॅड.निरंजन डावखरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, श्रीमती उमा खापरे, श्री.सदाशिव खोत, श्री.ज्ञानेश्वर म्हात्रे, श्री.विक्रांत पाटील, डॉ.परिणय फुके :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई शहर आणि उपनगरांतील उपनगरीय लोकल गाड्यांमधील गर्दी कमी करण्याच्या उद्देशाने राज्य शासनाने कार्यालयांच्या कामाच्या वेळा वेगवेगळया ठेवण्याच्या शिफारशीसाठी मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली माहे जुलै २०२५ मध्ये समिती नेमण्यात आली असून सदर उच्चस्तरीय १२ सदस्यांच्या समितीमध्ये उच्चपदस्थ अधिकाऱ्यांचा समावेश असून समितीचे अध्यक्ष राज्याचे मुख्य सचिव आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर समितीने गर्दीचे विश्लेषण, प्रवासी मार्गदर्शन, आणि कार्यक्षमतेच्या दृष्टीने काही विभागांची कार्यालये सकाळी ८ ते ४, काहींची ९ ते ५ आणि काहींची १० ते ६ अशा पध्दतीने विभाजन करण्याच्या उपाययोजना सुचविल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर समितीचा अहवाल शासनास प्राप्त झाला आहे असून अहवालावर शासनाने कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस (०३-०२-२०२६) :** (१) व (२) होय.

सदर समितीच्या दिनांक १३/०८/२०२५ च्या बैठकीत राज्य शासनाच्या अखत्यारीत येत असलेल्या वेगवेगळया विभागांच्या कार्यालयीन वेळांमध्ये दर तीन महिन्यांसाठी बदल निश्चित करण्यासाठी प्रायोगिक तत्त्वावर कोणत्याही दहा कार्यालयांच्या वेळा बदलून आढावा घेणे इ. मुद्यांवर चर्चा करण्यात आली.

(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## नंदुरबार येथील आदिवासी युवकाच्या हत्येप्रकरणी दोषींवर कारवाई करण्याबाबत

**(१३) ४९६३ (१७-१२-२०२५) श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.अभिजित वंजारी, श्री.धीरज लिंगाडे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नंदुरबार येथे एका आदिवासी युवकाच्या झालेल्या हत्येच्या निषेधार्थ काढण्यात आलेल्या मूकमोर्चाला हिंसक वळण लागले असून सदर जमावाने शासकीय वाहनांची तोडफोड केली व दगडफेक केल्यामुळे पोलीसांना सौम्य लाठीमार व अश्रुधुराचा वापर केल्याची बाब माहे सप्टेंबर, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, आदिवासी युवकाच्या हत्येप्रकरणी आणि त्यानंतर झालेल्या मूकमोर्चाला मिळालेल्या हिंसक वळणाबाबत तसेच सदर घटनेच्या पार्श्वभूमीवर कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झाल्यामुळे शासनाने यासंदर्भात कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस (०५-०२-२०२६) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) आदिवासी युवकाच्या हत्येप्रकरणी उपनगर पोलीस ठाणे येथे गु.र.नं २५८/२०२५ BNS कलम १०३ (१), १०९, ३५२, ३५१(१)(३), ४९(५) सह अनुसुचीत जाती जमाती कायदा १९८९ सुधारणा अधिनीयम २०२५ चे कलम ३ (१)(r), ३(१)(s), ३(२)(va), प्रमाणे गुन्हा दाखल आहे.

सदर गुन्ह्यातील मुख्य आरोपी नामे १) सुर्यकांत सुधाकर मराठे उर्फ भैय्या बोबड्या यास दिनांक १७/०९/२०२५ रोजी अटक करण्यात आली आहे. व आरोपी नामे २) चेतन निबांजी चौधरी यास दिनांक १८/०९/२०२५ रोजी अटक करण्यात आली आहे.

दिनांक २४/०९/२०२५ रोजी जिल्हाधिकारी कार्यालय येथे आदिवासी युवकाच्या खुनाच्या निषेधार्थ निघालेला मुकमोर्चा हा अचानक आक्रमक होऊन त्यातील हिंसक जमावाने जिल्हाधिकारी कार्यालय, पोलीस अधीक्षक कार्यालयावर तसेच पोलीस अधिकारी/ अंमलदार यांच्यावर दगडफेक करुन जिवे मारण्याचा प्रयत्न केला म्हणुन, नंदुरबार शहर पोलीस ठाणे येथे गु.र.नं. ५८३/२०२५ BNS कायदा चे कलम ६१ (२),१०९ (१), १९०, १८९ (२), १९१, १३२, १२१ (२), ३२४ (४)(५)(६), ११८ (१), ३२६ (फ), १२५(अ)(ब) सह सार्व.माल. नुकसान प्रति. कायदा कलम ३,७ सह क्रि.लॉ. अमें. ॲक्ट कलम ३ सह म.पो.का.क. ३७(१)(३) चे उल्लंघन १३५ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात येऊन सदर प्रकरणी प्रक्षोभक जमावातील १७३ हल्लेखोरांना अटक करण्यात आलेली असून ते सद्या मा.न्यायालयाच्या आदेशाने जामीनावर आहेत.

तसेच नंदुरबार उपनगर पोलीस ठाणे गु.र.नं.२६१/२०२५ भा.न्या.स.क. ६१, २२३, १०९, ३२४, (४),१३२,१२१(१), १८१(२)(३)(४)(५)(९),१९०,१९ १ (२)(३), ४९ सह आर्म ॲक्ट १९५९ चे कलम ४/२५ सह म.पो. अधिनियम १९५१ चे कलम (१) चे उल्लंघन -१३५ सह सार्व. संपत्ती नुकसान प्रतिबंधक अधिनीयम १९८४ चे कलम ३,७ फौजदारी कायदा (सुधारणा) कायदा २०१३ चे कलम ३ प्रमाणे दाखल असून एकुन ४३ आरोपी अटक केले होते व ते सद्या मा.न्यायालयाच्या आदेशाने जामीनावर आहेत.

(३) विलंब नाही.

---

## लोअर वर्धा प्रकल्पाच्या (ता.आवी, जि.वर्धा) बुडीत क्षेत्रामध्ये गेलेल्या पुनर्वसित वसाहतीकरीता निधी उपलब्ध करुन देण्याबाबत

**(१४) ७५३७ (१७-०३-२०२६) श्री.दादाराव केचे :** सन्माननीय **जलसंपदा(विदर्भ,तापी व कोकण खोरे विकास महामंडळ) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) लोअर वर्धा (जि.वर्धा) या प्रकल्पातील बुडीत क्षेत्रामध्ये गेलेल्या पुनर्वसीत वसाहतीकरीता १८ नागरी सोई सुविधा पूर्ण करण्याकरीता ३० कोटीची तरतूद करण्याबाबतचे निवेदन माननीय मंत्री मदत व पुनर्वसन त्यांना स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी दिनांक १४/१०/२०२५ रोजी दिले असूनही या प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांची वाढीव मोबदल्याचे शेतीचे प्रकरण गेल्या १५ वर्षापासून मा.उच्च न्यायालयामध्ये प्रलंबित असल्यामुळे प्रकल्पग्रस्त शेतकरी मोबदल्यापासून वंचित असल्याने न्यायालयात शासनाद्वारे सादर केलेले अपील प्रकरणे मागे घेऊन जिल्हा सत्र न्यायालयाच्या आदेशानुसार त्या प्रकल्पग्रस्तांना वाढीव मोबदला देण्याबाबतचे निवेदन माननीय मुख्यमंत्री यांना स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक १४ ऑक्टोबर, २०२५ रोजी दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांना वाढीव मोबदल्याबाबत जिल्हा सत्र न्यायालयाने दिलेला निकाल मान्य असतानाही विदर्भ सिंचन विकास महामंडळ नागपूर यांनी उच्च न्यायालयात अपील दाखल केल्यामुळे व ते अपील १५ वर्षांपासून प्रलंबित असल्यामुळे प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांना वाढीव मोबदला मिळण्यापासून वंचित रहावे लागत आहे,हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, गत १५ वर्षापासून उच्च न्यायालयामध्ये प्रलंबित असलेले अपील मागे घेण्याबाबत तसेच प्रकल्पातील बुडीत क्षेत्रामध्ये गेलेल्या पुनर्वसीत वसाहतीकरीता १८ नागरी सोई सुविधा पूर्ण करण्या करीता ३० कोटीची तरतूद करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गिरीश महाजन (१७-०४-२०२६) :** (१) हे खरे नाही,

स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक १४ ऑक्टोबर, २०२५ रोजी दिलेले निवेदन या कार्यालयास अद्याप प्राप्त नाही. परंतु सदर आशयाचे दिनांक १२/१०/२०२५ व दिनांक १३/१०/२०२५ रोजीचे निवेदन या कार्यालयास प्राप्त झालेले आहेत.

(२) नाही, हे खरे नाही.

(३) निम्न वर्धा प्रकल्प अंतर्गत एकूण १३०९ प्रकरणे दिवाणी न्यायालयामध्ये भुधारकांनी दाखल केली होती. त्यापैकी ११४५ प्रकरणात मा.न्यायालयाचा आदेश झालेला असून, रुपये २३.९२ कोटी एवढा निधी न्यायालयामध्ये जमा करण्यात आलेला आहे. ११४५ प्रकरणांपैकी ५६० प्रकरणे महामंडळामार्फत मा.उच्च न्यायालयामध्ये अपील दाखल करण्यात आली होती. त्यापैकी ३९६ प्रकरणे सन २०१८, २०१९ व २०२० या कालावधीत टप्याटप्याने महालोक अदालतीमध्ये निकाली काढण्यात आली. व त्या सर्व प्रकरणात आवश्यक रक्कम मा.न्यायालयामध्ये जमा करण्यात आली आहे. तसेच सन २०२५-२६ मध्ये २५ प्रकरणे मा.उच्च न्यायालयाने निकाली काढलेली आहे. त्यामुळे सद्य:स्थीतीत मा.उच्च न्यायालयामध्ये १३९ प्रकरणे सुरू आहेत.

निम्न वर्धा प्रकल्पांमध्ये वर्धा जिल्ह्यामधील २० बाधित गावांचे पुनर्वसन २३ पर्यायी गावठाणांमध्ये करण्यात आले १८ नागरी सुविधांची कामे पूर्ण झालेली होती. त्यापैकी निंबोली-दवलतपुर वगळता २२ पुनर्वसीत गावठाणातील १८ नागरी सुविधा दिनांक ३०/१०/२०१७ रोजी जिल्हा परिषद, वर्धा यांना हस्तांतरित करण्यात आलेल्या आहेत. तसेच केलेल्या नागरी सुविधा क्षतीग्रस्त झाल्यामुळे सदर नागरी सुविधांच्या देखभाल व दुरूस्ती करीता रुपये ३०.९५ कोटी खर्चाच्या प्रस्तावास शासन पत्र दिनांक १४/०९/२०१७ अन्वये मान्यता मिळाली आहे. त्यानुसार देखभाल दुरूस्तीची कामे पूर्ण करण्यात आली आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## जळगाव जिल्ह्यातील गिरणा नदी पात्रातील सात बलून बंधाऱ्यांच्या नाविन्यपूर्ण प्रकल्पाच्या अंमलबजावणीबाबत

**(१५) ७६७२ (१७-०३-२०२६) श्री.एकनाथराव खडसे :** सन्माननीय **जलसंपदा (विदर्भ,तापी व कोकण खोरे विकास महामंडळ) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) जळगाव जिल्ह्यातील गिरणा नदी पात्रात सात बलून बंधाऱ्यांचा नाविन्यपूर्ण प्रकल्प प्रस्तावित असून, माहे डिसेंबर, २०२२ मध्ये सदर प्रकल्पास रुपये १,२०५ कोटी इतकी पहिली सुधारित प्रशासकीय मान्यता देण्यात आली असल्याचे माहे जानेवारी,२०२६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रकल्पास मान्यता मिळून सुमारे तीन वर्षांचा कालावधी उलटूनही अद्याप या प्रकल्पाची प्रत्यक्ष अंमलबजावणी सुरू झालेली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, नाविन्यपूर्ण प्रकल्पांतर्गत गिरणा नदी पात्रात बलून बंधाऱ्यांचे बांधकाम सुरू करण्यासाठी शासनाकडून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गिरीश महाजन (१७-०४-२०२६) :** (१) व (२) अंशत: खरे आहे.
जळगाव जिल्ह्यातील ७ बलून बंधारे या प्रकल्पास शासन निर्णय दिनांक २८/१२/२०१८ अन्वये मूळ प्रशासकीय मान्यता प्राप्त आहे. सदर मूळ प्रशासकीय मान्यता आदेशानुसार या प्रकल्पावर होणारा १००% खर्च केंद्र शासनामार्फत उपलब्ध होणाऱ्या अर्थसहाय्यातून करण्यात यावा असे नमुद आहे. परंतु, केंद्र शासनाकडून आजतागायत कुठल्याही योजनेतून निधी उपलब्ध न झाल्याने प्रकल्पाचे काम सूरु होवू शकले नाही. दरम्यान प्रकल्पाचा अद्यावत दर सूचीवर आधारित रुपये १२०५.७२ कोटी किंमतीचा प्रथम सुधारीत प्रशासकीय मान्यता अहवाल शासनास मंजुरीसाठी सादर करण्यात आला असून त्यावरील कार्यवाही प्रगतीपथावर आहे.
(३) या सात बंधारे (Pneumatically Operated Gated Weirs) प्रकल्पांतर्गत "हवादाबद्वारे नियंत्रित/ चलित दरवाजे" ऐवजी "पारंपारिक उच्चपातळी उच्चालक दरवाजे" असलेले बंधारे प्रस्तावित करुन प्रथम सुधारीत प्रशासकीय मान्यतेचा प्रस्ताव शासनास सादर करण्यास तापी पाटबंधारे विकास महामंडळाच्या दिनांक १५/१०/२०२५ रोजी नियामक मंडळाची मान्यता प्राप्त झालेली आहे.

त्या अनुषंगाने गिरणा नदीवर पारंपारिक उच्चपातळी उच्चालक दरवाजे असलेले बंधारे कामे होणेकरीता सद्य:स्थितीत अद्यावत अंदाजपत्रके तयार करण्याचे काम क्षेत्रिय स्तरावर प्रगतीत आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## मुंबईतील २८ हजार सफाई कामगारांसाठी मालकी तत्वावर घरे उभारण्यात येणार असल्याबाबत

**(१६) १०४३० (२०-११-२०२१) श्री.प्रविण दरेकर :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबईतील २८ हजार सफाई कामगारांना आश्रय योजनेंतर्गत वसाहतींच्या पुर्नविकासासाठी महानगरपालिकेने १७०० कोटी रुपयांच्या कामांच्या प्रस्तावाला मंजुरी दिली असल्याची माहिती माहे ऑक्टोबर, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सन २०१७ मध्ये सुरु करण्यात आलेली सदर योजना एवढ्या धीम्या गतीने सुरु असण्यामागची सर्वसाधारण कारणे काय आहेत,
(३) असल्यास, मुंबईतील २८ हजार सफाई कामगारांसाठी मालकी तत्वावर उभारण्यात येणाऱ्या घरांबाबत नगरविकास विभागाने सदर सफाई कामगारांना मालकी तत्वावर घरे देण्याचा महानगरपालिकेचा कोणताही विचार नसल्याचे म्हटले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, नगरविकास विभागाने शासन परिपत्रक क्रमांक काका-२०१५/सं.क्र.४२/नवि-३४/ दिनांक १२/०६/२०१५ नुसार मुंबईतील सफाई कामगारांना मालकी हक्काची घरे देण्याचा निर्णय घेतला होता, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी केली आहे काय, चौकशीनूसार मुंबईतील २८ हजार सफाई कामगारांना लवकरात लवकर मालकी हक्काची घरे उपलब्ध करून देण्यासाठी शासन कोणती उपाययोजना करणार वा करित आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (२०-०२-२०२६) :** (१) होय, हे खरे आहे.

बृहन्मुंबई महानगरपालिकेतील सुमारे २७९०० सफाई कर्मचाऱ्यांना सेवानिवासस्थाने पुरविण्याकरीता सद्य:स्थितीत असलेल्या ३० वसाहतींचा कमाल ४.०० चटई क्षेत्र निर्देशांक वापरुन आश्रय योजनेंतर्गत सफाई कामगारांना वाढीव क्षेत्रफळाची (किमान ३०० चौ.फुट) सेवानिवासस्थाने देण्यासाठी महापालिकेतर्फे पुनर्विकास करण्याचे नियोजिले आहे.
(२) कामगारांच्या वसाहतींचा पुनर्विकास करण्यासाठी ई-निविदेसाठी असलेला अल्प प्रतिसाद यामुळे निविदांना वारंवार मुदतवाढ द्याव्या लागतात व इतर तांत्रिक बाबीमुळे निविदा प्रक्रीया पूर्ण करण्यास तसेच पुनर्विकासाच्या ठिकाणावरुन सफाई कामगारांचे स्थलांतर ह्या सर्व प्रक्रियेस कालावधी आवश्यक आहे.

तथापि, आश्रय योजनेंतर्गत पुनर्विकासापूर्वी तेथे राहत असलेल्या सदनिकाधारकांना स्थलांतरित करण्याकरीता शहर तसेच उपनगरात एकूण ११ ठिकाणी तात्पुरत्या स्वरुपाचे संक्रमण शिबिरांचे बांधकाम पूर्ण झाले होते, तसेच कोचिन स्ट्रीट, ए विभाग, सिध्दार्थ नगर, ई विभाग येथील प्रथम टप्प्यातील तर पॉवेल्स लॅंड, आर/दक्षिण येथील पुनर्विकासाचे काम पूर्ण झाले असून बांधकामे पूर्ण झालेली इमारती मुख्य

पर्यवेक्षक (घकव्य) यांना हस्तांतरित करण्यात आली आहे. तसेच एफ/दक्षिण विभागातील गौतमनगर टप्पा-१, ई-विभागातील टॅकपाखाडी टप्पा-१ व एच/पश्चिम विभागातील हसनाबाद लेन टप्पा-१ ची पुनर्विकासाची कामे प्रगतीपथावर आहेत. डिझाईन आणि बिल्ट टर्नकी अंतर्गत शहर, पू.उप. व प.उप. येथील ३० ठिकाणांपैकी २३ ठिकाणची पुनर्विकासाची कामे हाती घेण्यात आली आहेत आणि उर्वरित ७ ठिकाणी मुख्य पर्यवेक्षक (घकव्य) विभागामार्फत सेवासदनिका धारकांना स्थलांतरित करण्याची प्रक्रिया सुरु आहे.

(३), (४) व (५) बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या घन कचरा व्यवस्थापन खात्यात एकूण २७९०० कायम सफाई कामगार आहेत. सद्य:स्थितीत सुमारे ६००० कामगारांकरीता सेवासदनिका देण्यात आल्या आहेत. तसेच अस्तित्वात असलेल्या सफाई कामगारांच्या भूखंडावर आश्रय योजनेंतर्गत पुनर्विकास करुन अंदाजे १२००० सेवासदनिका बांधण्याबाबतची कार्यवाही सुरु आहे.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## मुंबईतील नायर रुग्णालयाला निधी उपलब्ध करुन देण्याबाबत

**(१७) ११००० (२०-११-२०२१) श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.अभिजित वंजारी, श्री.जयंत आसगावकर :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील नायर रुग्णालयातील रुग्णांसाठी विविध सुविधा आणि आधुनिकतेवर भर देण्यासाठी शासनाने या रुग्णालयाला शासनाच्यावतीने १०० कोटी रुपयांचा निधी देण्याची घोषणा केली असल्याचे दिनांक ५/९/२०२१ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने उक्त प्रकरणी निधीची तरतूद करुन नायर रुग्णालयाला १०० कोटी रुपयांचा निधी लवकरात लवकर उपलब्ध करुन देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (२०-०२-२०२६) :** (१) हे खरे आहे.

(२) याबाबत, नायर रुग्णालयातील विविध प्रकल्पासाठी लागणाऱ्या निधी उपलब्धतेबाबत बृहमुंबई महानगरपालिकेच्या स्तरावर कार्यवाही सुरु आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## मालाड (पश्चिम) येथील राठोडी गावातील अनधिकृत बांधकामाविरूध्द कारवाई करण्याबाबत

**(१८) ११४३४ (२०-११-२०२१) श्री.प्रसाद लाड :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोरोना संसर्गाच्या संकटादरम्यान अवैध बांधकामे तोडणे, मालमत्ता रिक्त करून घेणे अशा प्रशासनाच्या कार्यवाह्यांना दिलेली अंतरिम स्थगिती मा.मुंबई उच्च न्यायालयाने केवळ पाच जिल्हे वगळता उर्वरित संपूर्ण राज्यासाठी मागे घेतली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मा.मुंबई उच्च न्यायालयाने अंतरिम स्थगिती मागे घेतली असल्याने मुंबईसह अनेक जिल्ह्यात अवैध बांधकामांवर हातोडा चालवणे, कायदेशीररित्या मालमत्ता रिक्त करून घेणे अशा कार्यवाह्या करण्यासाठी प्रशासनाचा मार्ग मोकळा झाला असून मालाड (पश्चिम) येथील राठोडी गावात मार्वे रोडवर नॉन डेव्हलपमेंट झोनमध्ये उभ्या राहिलेल्या अनधिकृत बांधकामाविरूध्द कारवाई करण्यात यावी यासाठी श्री.मोहन कृष्णन, अध्यक्ष, भ्रष्टाचार आणि अपराध निवारक यांनी आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका यांचेकडे माहे ऑक्टोबर, २०२१ च्या पहिल्या आठवड्यात वा त्यासुमारास लेखी तक्रार निवेदनाद्वारे केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, स्थानिक गुंडामार्फत दहशत पसरवून राठोडी गावात ग्रीन हाऊस शेजारी एकूण दिडशेहून अधिक अनधिकृत बांधकामे उभारण्यात आल्यासंदर्भात स्थानिक रहिवाशांनी तक्रारी केलेल्या असतानाही महानगरपालिकेच्या पी/उत्तर विभागाने कोणतीही कारवाई केली नसल्याने श्री.मोहन कृष्णन यांनी आयुक्त, महानगरपालिका यांच्याकडे सदरहू निवेदनाद्वारे तक्रारी केल्या आहेत तसेच या प्रकरणी उचित कार्यवाही होण्याकरीता श्री.सुहास वाडकर, उपमहापौर यांनी पी/उत्तर विभागाच्या सहाय्यक आयुक्तांना यापूर्वीच पत्र पाठविलेले आहे तसेच अनेक स्मरणपत्रेही पाठविली आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, या प्रकरणी माजी खासदार श्री.हुसेन दलवाई यांनीही थेट मा.मुख्यमंत्री यांना पत्र पाठवल्यानंतर श्री.इकबालसिंग चहल आयुक्त, महानगरपालिका यांनी हे प्रकरण अतिरिक्त आयुक्त(पश्चिम उपनगरे) यांच्याकडे सोपविलेले असताना नऊ महिन्यांचा कालावधी उलटला तरीही अद्याप या प्रकरणी कोणतीही कारवाई होत नसल्याने येथील रहिवाशांनी नाराजी व्यक्त केली आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, या संपूर्ण प्रकरणाची विनाविलंब चौकशी होऊन संबंधितांवर जबाबदारी निश्चित करून निलंबनाची कारवाई तसेच तेथील अनधिकृत बांधकामांवर कारवाई करुन सदर जागा रिक्त करण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (२०-०२-२०२६) :** (१) होय, हे अंशत: खरे आहे.

मा.मुंबई उच्च न्यायालयाने Suo Moto PIL No. १ of २०२१ अन्वये कोविड संसर्गाच्या पार्श्वभूमीवर देण्यात आलेली स्थगिती दिनांक २१/१०/२०२१ रोजीच्या आदेशान्वये उठविलेली आहे.
(२) होय, हे खरे आहे.

श्री.मोहन कृष्णन, अध्यक्ष, भ्रष्टाचार आणि अपराध निवारक परिषद यांनी राठोडी परिसरातील अनधिकृत बांधकामावर कारवाई करण्याकरीता तक्रार दाखल केलेली आहे.
(३) होय, हे अंशत: खरे आहे.

श्री.मोहन कृष्णन, अध्यक्ष, भ्रष्टाचार आणि अपराध निवारक परिषद यांनी राठोडी परिसरातील अनधिकृत बांधकामावर कारवाई करण्याकरीता तक्रार दाखल केलेली आहे. तसेच उपमहापौर श्री.सुहास वाडकर यांचे कडून या कार्यालयास पत्र प्राप्त झालेले आहे.

राठोडी गावात ग्रीन हाऊस शेजारी स्थानिक गुंडांमार्फत दहशत पसरवून दिडशेहून अधिक अनधिकृत बांधकामे झाली असल्याबाबतच्या तक्रारीमध्ये कुठलेही तथ्य आढळून येत नाही. तसेच या कार्यालयामार्फत उपरोक्त परिसरात जानेवारी २०२१ ते आजपर्यंत एकूण ४३ अनधिकृत बांधकामांना नोटिस बजावून कारवाई करण्यात आलेली आहे.

(४) होय, हे अंशत: खरे आहे.

माजी खासदार श्री.हुसेन दलवाई यांचे पत्र महानगरपालिका कार्यालयास प्राप्त झाले होते. उपरोक्त परिसरात जानेवारी २०२१ ते आजपर्यंत एकूण ४३ अनधिकृत बांधकामांना नोटिस बजावून कारवाई करण्यात आलेली आहे.

(५) सदर प्रकरणी अनधिकृत बांधकामांवर कारवाई करण्यात आली आहे.

(६) प्रश्न उध्दभवत नाही.

---

## बोरीवली (पूर्व), मुंबई येथे युपीएससी/एमपीएससी मार्गदर्शक केंद्रासाठी निधी उपलब्ध करुन देण्याबाबत

**(१९) १३३८२ (३०-०३-२०२२) श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, ॲड.निरंजन डावखरे, श्री.सदाशिव खोत :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील बोरीवली (पूर्व),येथील सीटीसीआरसी मैदान, अभिनव नगर, काजूपाडा येथे युपीएससी/एमपीएससी मार्गदर्शन केंद्रासाठी निधी उपलब्ध करून देण्याबाबतची मागणी मा.विरोधी पक्षनेते, विधानपरिषद यांनी त्यांच्या दिनांक १ जुलै, २०१९ रोजीच्या पत्रान्वये शासनाकडे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर मागणीच्या अनुषंगाने त्याबाबतचा प्रस्ताव संबंधित विभागाने आयुक्तांना सादर केला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास,याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,चौकशीच्या अनुषंगाने मार्गदर्शन केंद्र तातडीने उभारण्यासाठी निधीची उपलब्धता करण्याबाबत महानगरपालिकेने कोणता निर्णय घेतला आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (२१-०२-२०२६) :** (१) व (२) हे खरे नाही.

(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## मुंबईतील ३८८ इमारतींच्या पुनर्विकासाबाबत

**(२०) २११८८ (०४-०१-२०२४) श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.अभिजित वंजारी, श्री.सुधाकर अडबाले, श्री.धीरज लिंगाडे :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील जुन्या मोडकळीस आलेल्या ३८८ इमारती असून सदर इमारतींचा पुनर्विकास मालक व भाडेकरु करीत नसल्याची बाब निदर्शनास आली असून सदरच्या इमारतींचा पुनर्विकास म्हाडाने नियंत्रण नियमावलीतील नियम ३३(७) अंतर्गत करण्याबाबतची मागणी गोरडे कृती समितीने मा.मुख्यमंत्री, अप्पर मुख्य सचिव, नगरविकास विभाग व नगरविकास मंत्री यांच्याकडे माहे ऑगस्ट,२०२३ रोजी वा त्यासुमारास केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर मुंबईतील ३८८ जुन्या इमारतींचा पुनर्विकास करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (०१-०४-२०२६) :** (१) व (२) मुंबईतील पुनर्रचित ३८८ जुन्या इमारतींचा पुनर्विकास करण्याच्यादृष्टिने नगरविकास विभागाने दिनांक ०३/११/२०२३ रोजीच्या अधिसुचना अन्वये विकास नियंत्रण नियमावली ३३(२४) मध्ये सुधारणा केल्या असून, या सुधारित अधिसुचनेनुसार प्रोत्साहनात्मक चटई क्षेत्र निर्देशांक देण्याचे मान्य केले आहे. याबाबत अंतिम अधिसुचना नगरविकास विभागाने दिनांक ०८/१०/२०२४ रोजी निर्गमित केली.

नगरविकास विभागाने उपकरप्राप्त इमारतींच्या पुनर्विकासामध्ये जे लाभ विकास नियंत्रण नियमावली विनियम ३३(७) अंतर्गत मिळतात ते लाभ म्हाडाने बांधलेल्या पुनर्रचित इमारतींच्या पुनर्विकासामध्ये मिळण्याकरीता दिनांक १८/०७/२०२५ रोजी अधिसुचना प्रसिध्द केली. सदर अधिसूचनेनुसार विकास नियंत्रण नियमावली ३३(२४) अंतर्गत म्हाडाने बांधलेल्या पुनर्रचित इमारतींच्या पुनर्विकासामध्ये भुखंडांच्या संख्येवर आधारीत अतिरिक्त ५%, ८%, व १५% पुनर्वसन चटई क्षेत्र अनुज्ञेय करण्यात आले आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**विधान भवन :** **डॉ. विलास आठवले**

**मुंबई.** **सचिव-३,**

**महाराष्ट्र विधानपरिषद.**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर करण्यात आली आहे.
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.